**Condition :–** It is required to provide the access road to subjected land, from the premises of Ferguson College.

*By Order and in the name of the Governor of Maharashtra,*

**PRANAV KARPE,**
Under Secretary to Government.

---

**जिल्हाधिकारी यांजकडून**

**जिल्हा कोल्हापूर**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६, पोट-कलम (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये.*

**अधिसूचना**

**(नमुना १-अ)**

क्रमांक कार्यासन-११/भूसं/आरआर/एलएक्यू/स्पे./४९४/इचलकरंजी/५८९/२०२५.— ज्याअर्थी, इचलकरंजी शहराच्या मूळ हद्दीच्या भागश: क्षेत्राची व वाढीव हद्दीची सुधारित विकास योजना (यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त नगर रचना अधिनियम" म्हणून संबोधिलेला) चे कलम ३१ *(१)* नुसार नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१११/१३५२/सीआर-१९/१२/डी.पी.सॅन्क्शन/यूडी-१३, दिनांक २४ मे २०१२ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक १० जुलै २०१२ पासून अमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत मौजे इचलकरंजी, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील सोबतच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली सि.स.नं. १७५६० पै. (गट नंबर ६४७/२ पै.) (यापुढे "उक्त जमीन" म्हणून संबोधिलेली) ही जमीन आरक्षण क्रमांक ३८, "गार्डन" या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित आहेत. (यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधिलेले) ;

आणि ज्याअर्थी, इचलकरंजी महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून (यापुढे "उक्त महानगरपालिका" म्हणून संबोधिलेली) उक्त नगर रचना अधिनियमाचे कलम, १२६ अन्वये उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करणेबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे दिनांक ३० जानेवारी २०२४ चे पत्र क्रमांक इ.म.पा./न.र.वि./१२२३/प्र.क्र.०४७/१८९५/२४ अन्वये प्रस्ताव सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १५१, पोट-कलम *(१)* खालील अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१७५/५१०६/यूडी-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये, मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनींच्या संपादनाबाबतच्या उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(१)*, *(२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती त्या-त्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाकडील अधिसूचना क्रमांक एमआयएस-११/२०१४/सीआर-७७(पार्ट-२)/ए-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ अन्वये, भूसंपादन अधिनियम, २०१३ अंतर्गत भूसंपादनाच्या कार्यवाहीसाठी सुमारे १०,००० हे. क्षेत्राच्या मर्यादेत समुचित शासन म्हणून शासनाचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२५ मध्ये सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ५ *(१)* अन्वये दाखल मजकूर व ५ *(२)* अन्वये दाखल परंतुकानुसार उक्त नगर रचना अधिनियमांतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे "उक्त भूसंपादन अधिनियम" म्हणून संबोधिलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्हीसह) यामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती, अशा जमिनींच्या संदर्भात लागू होत नाहीत, तसेच शासनाच्या नगर विकास विभागाकडील दिनांक ८ मार्च २०१९ चे पत्र क्रमांक टीपीएस/१८१९/१७९६/प्र.क्र.२९८/१८/नवि-१३ अन्वये, "उक्त नगर रचना अधिनियमांतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनींचे संपादन करताना उक्त भूसंपादन अधिनियमातील कलम ११ *(१)*, १६ ते १८ व यासोबतचे परिशिष्ट दोन व तीन, तसेच या अनुषंगिक कलमे लागू होणार नाहीत." अशा मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, सोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या व उक्त विकास योजनेत आरक्षण क्रमांक ३५, "गार्डन" यासाठी आरक्षित केलेल्या जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता असल्याबाबत समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसान भरपाईची संपूर्ण रक्कम उक्त महानगरपालिकेने अदा करावयाची आहे.

त्याअर्थी, शासनाने प्रदत्त केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(४)* सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, कोल्हापूर याद्वारे असे घोषित करतात की, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत.

उक्त भूसंपादन अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, कोल्हापूर उक्त भूसंपादन अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी भूमी संपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर यांस पदनिर्देशित करीत आहेत.

त्याचप्रमाणे उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करणेबाबतची कार्यवाही आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी व ताब्यात घ्यावी, असे निर्देश देण्यात येत आहेत.

## अनुसूची - एक

### संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

### जिल्हा कोल्हापूर, तालुका हातकणंगले, गावाचे नाव इचलकरंजी

| अ. क्र. | नगर भूमापन क्रमांक / गट नंबर | अंदाजित क्षेत्र | चतु:सीमा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३<br>(चौ.मी.) | ४ |
| १ | सि.स.नं. १७५६० पै.<br>(गट नंबर ६४७/२) | १६०० | पूर्व - सि.स.नं. १७५६१<br>पश्चिम - सि.स.नं. १७५५९<br>उत्तर - रस्ता<br>दक्षिण - १७५३८ |

## अनुसूची - दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** :- मौजे इचलकरंजी, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर, सि.स.नं. १७५६० पै. (गट नंबर ६४७/२ पै.) ही जमीन इचलकरंजी शहराच्या मूळ हद्दीच्या भागश: क्षेत्राच्या व वाढीव हद्दीच्या मंजूर सुधारित विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ३५, "गार्डन" साठी भूसंपादन करणे.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन** :- आरक्षण क्रमांक ३५, "गार्डन" यासाठी भूसंपादन करणे.

**समाजाला होणारे लाभ** :- पायाभूत सुविधा, सोयी-सुविधा.

## अनुसूची - तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

### जिल्हा कोल्हापूर, तालुका हातकणंगले, गावाचे नाव इचलकरंजी

| अ. क्र. | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अनुसूची - चार

### (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

**निरंक**

**टीप :** उक्त जमिनींचा नकाशा भूमी संपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर यांच्या १०९१, सी वॉर्ड, बिंदू चौक, कोल्हापूर येथील कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत निरीक्षणासाठी उपलब्ध आहे.

**अमोल येडगे** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, कोल्हापूर.

कोल्हापूर, २६ जून २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

**भूसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २१ च्या पोट कलम (१) व (२) अन्वये प्रसिध्द करावयाचे प्रकटपत्र.**

यावरुन जाहिररित्या जाणीव करुन देण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (४) सह भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील दि.२६/०६/२०२५ ची क्र.कार्यासन-११/भूसं/आरआर/एलएक्यू/स्पे/४९४/इचलकरंजी/५८९ अन्वयेची अधिसुचना दि. ३०/०६/२०२५ चे महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक- असाधारण -पुणे विभागीय पुरवणीमध्ये पृष्ठ क्र. ४ व ५ वर प्रसिध्द झालेली आहे.

मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या अधिसुचनेमध्ये नमुद इचलकरंजी शहरात किंवा शहराजवळ असलेल्या जमिनींपैकी खाली दर्शविलेल्या सि.स.नं./गट नं. मधील नुकतीच निशाणी केलेली, त्यावर असलेले झाडे झुडपे वगैरेसह खाली दर्शविल्याप्रमाणे कमी किंवा अधिक भरणारी जागा सरकारकडून लवकरच इचलकरंजी शहराच्या मुळ हद्दीच्या भागश: क्षेत्राची व वाढीव हद्दीची मंजूर सुधारित विकास योजनेतील आरक्षण क्र. ३८ "गार्डन" या सार्वजनिक प्रयोजनासाठी ताब्यात घेण्यात येणार आहे.

तरी सदरहू जमिनीत हितसंबध असलेल्या सर्व इसमांस यावरुन फर्मविण्यात येते की, त्यांनी भूमि संपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर १०९१, सी वॉर्ड, बिंदू चौक, कोल्हापूर यांच्या कार्यालयात दि. ०५/०८/२०२५ रोजी सकाळी १२:०० वाजता जातीने अगर अभिकर्ता मार्फत हजर राहून सदरहु जमिनीतील आपआपल्या हितसंबधाचा प्रकार, त्यासंबंधात मिळावयाच्या मोबदल्याच्या रकमेचा तपशील व सदरहू अधिनियमाचे कलम २० अन्वये केलेल्या जागेच्या मोजणी संबंधी काही हरकती असल्यास त्याची संपूर्ण तपशीलवार माहिती दयावी, चुकू नये.

**परिशिष्ट**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

**गावाचे नांव - इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर**

| अ. क्र. | संपादना खालील मिळकती — भूमापन क्र. किंवा गट नं. | संयुक्त मोजणी विवरण पत्रानुसारचे क्षेत्र (चौ.मी.) | भुसंपादना खालील अंदाजित क्षेत्र (चौ.मी.) | चतु: सिमा |
|---|---|---|---|---|
| १. | सि.स.नं. १७५६० पै (ग.नं. ६४७ /२) | १६००.०० | १६००.०० | पूर्व- सि.स.नं. १७५६१<br>पश्चिम- सि.स.नं. १७५५९<br>उत्तर- रस्ता<br>दक्षिण- सि.स.नं. १७५३८ |

**ज्यासाठी जमीन संपादन करावयाची आहे ते प्रयोजन :-**

मौ.इचलकरंजी ता.हातकणंगले जि.कोल्हापूर सि. सं. नं. १७५६० पै (गट नं. ६४७/२ पै) ही जमीन इचलकरंजी शहराच्या मुळ हद्दीच्या भागश: क्षेत्राच्या व वाढीव हद्दीच्या मंजूर सुधारित विकास योजनेतील आ.क्र. ३५ "गार्डन" साठी भूसंपादन करणे.

(प्रियांका धनवडे)
प्र. भूमी संपादन विशेष अधिकारी (११),
कोल्हापूर

जा.क्र. एलएक्यू/स्पे/४९४/ इचलकरंजी_/भूसंविअ-११को/३६४
दिनांक :- ०१/०७/२०२५
ठिकाण : १०९१, सी वॉर्ड, बिंदूचौक, कोल्हापूर

भूमि संपादन विशेष अधिकारी (११) कोल्हापूर